**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम,2005 कलम 19(1) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिलाचे कामकाज**

प्रथम अपील क्रमांक
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र साप्रवि/आस्था-8/मासे/ २ ८२ /19
नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
दिनांक १ / ५ /2019

1.श्री. रत्नाकर जनार्दन गाडे,
4398 जंगम चौक (गाडे वाडा) पंचवटी,
नाशिक

अपिलार्थी ...

--विरुध्द--

1.श्री.रणजीत अरूण पगारे,
जन माहिती अधिकारी तथा
कनि.प्रशा. अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक

उत्तरवादी ...

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) नुसार प्रथम अपिल**

**-: विवेचन :-**

श्री. रत्नाकर जनार्दन गाडे, 4398 जंगम चौक (गाडेवाडा) पंचवटी, नाशिक अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस, मी दि.4/12/2018 रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर संबधितावर कर्मचा-यांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळावा इ. दिनांक 8/1/2019 रोजीचा माहिती अधिकार अर्ज दिनांक 8/1/2019 रोजी कार्यालयास व दिनांक 10/1/2019 रोजी प्राप्त झाला होता.

अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे मुळ अर्जात नमुद माहिती ही साप्रवि आस्था-4 संकलनाशी निगडीत असल्याने व सदर मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणे करिता माहिती अधिकार मुळ अर्ज दिनांक 10/1/2019 अन्वये आस्था 4 संकलनाकडे वर्ग करण्यात आला होता.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीला अनुसरुन आस्था 4 संकलनाने जा.क्र.साप्रवि/आस्था 4/399/2019 दिनांक 5/2/2018 अन्वये 'अर्जात नमुद केलेनुसार संबधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कार्यवाही करणेत आलेली नाहि. तत्राप आपण विनंतीने मुख्यालयात बदली होणेबाबत केलेले विनंती अर्जावर दि.10/8/2018 रोजी कार्यवाही प्रस्तावित करणेत आलेली आहे. तत्राप निर्णय प्रलंबित आहे. आपले वय 53 या प्राधान्यक्रमानुसार विनंती बदली होणेकामी नस्ती प्रस्तावित आहे. आपण सदरबाबत समक्ष येवुन नस्तीचे अवलोकन करावे' असे कळविले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते. परंतु,अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नाही म्हणुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 19 (1) नुसार दि.8/2/2019 रोजी प्रथम अपिल अर्ज या कार्यालयाकडे सादर केला.

अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक.28/2/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक यांच्या दालनात ठेवण्यात आली. परंतु दिनांक 28/02/2019 उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक यांना सर्वसाधारण सभा असल्याने सदर सुनावणी रदद करुन दिनांक 11/03/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी ठेवण्यात आली. परंतु उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक सकाळसत्रात यांना जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वाची सभा होती.तदनंतर मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक सभेवरुन जिल्हा परिषद नाशिक च्या कार्यालयात उपस्थित झाले त्यावेळी श्री. रत्नाकर गाडे कार्यालयात नव्हते. सदर सुनावणी झाली नाही. तदनंतर दिनांक 18/3/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक ठेवण्यात आली. सदर सुनावणीस श्री.रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक, आस्था- 4 संकलनाचे श्रीम शितल शिंदे, क.सहा हे उपस्थित होते व अपील अर्जदार, श्री. रत्नाकर गाडे हे उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिल अर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की अर्जदार अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती आस्था 4 संकलनाकडुन अर्जदार

यांना पोष्टाने जा.क्र.साप्रवि/आस्था 4/399/2019 दिनांक 5/2/2019 या पत्रान्वये माहिती कळविण्यात आलेली आहे. मात्र अपिलार्थी यांनी सदरचे पत्र मला प्राप्त झालेले नाही असे सांगितले. तदनंतर जन माहिती अधिकारी व संबधीत संकलनाचे कर्मचारी व अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तीवादावरून मी प्रथम अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**-: निर्णय :-**

श्री. रत्नाकर जनार्दन गाडे, अपिलार्थि यांचे दिनांक 8/1/2019 चे मुळ अर्जानुसारअपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकि जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे अशा माहितीचे छायांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी आस्था-4 संकलना मार्फत अपिलार्थी यांना तात्काळ पुरविणेत यावी.

सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे.

**(प्रदिप चौधरी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**स्थळ - नाशिक**
**दि. ~~25 मार्च 2019~~**
1/4/2019

**<u>रजिष्टर पोस्टाने</u>**

प्रति,

1.श्री. रत्नाकर जनार्दन गाडे,4398 जंगम चौक (गाडेवाडा) पंचवटी नाशिक
2.श्री.रणजीत अरूण पगारे,सहा. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक
3.श्रीम. शितल शिंदे, कनि. सहा. आस्था-4 साप्रवि, जि.प.नाशिक

---

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) नुसार व्दीतीय अपील करावयाचे असल्यास सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांचे आत खालील पत्त्यावर अपिलीय अधिकारी यांचे कडेस अपील करता येईल.

मा.राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,नाशिक खंडपिठ,
पिनॅकल मॉल,चौथा मजला,त्र्यंबकनाका सिग्नल जवळ,नाशिक
तालुका व जिल्हा नाशिक (महाराष्ट्र),दुरध्वनी क्रमांक (0253) 2232764